# प्रस्तावना

मोटार वाहनाचा शोध हा मानवी बुध्दीमत्तेचा आणि प्रतिभेचा चमत्कारच आहे. मानवी जीवन सुखी व समृध्द करण्यामध्ये मोटार वाहनाचा फार मोठा वाटा आहे. मोटार वाहनामुळे अनेक देश-प्रदेश, धर्म-संस्कृति जवळ आल्या. मानवाच्या ज्ञानाच्या, देशाटनाच्या कक्षा त्यामुळे रुंदावल्या. मोटार वाहनाचा प्रचार व प्रसार जसजसा वाढत गेला, त्याची गरज जसजशी तीव्र होत गेली तसतसे त्यावर नियंत्रण व त्याचे नियमन करण्याची गरज भासली. त्यातून मोटार वाहन विषयक कायद्याची व त्यांची अंमलबजावणी करणाऱ्या मोटार वाहन विभागाची निर्मीती झाली. मोटार वाहनांची मागणी व संख्या जसजशी वृध्दिंगत होत गेली त्या प्रमाणात रस्ते, प्रदुषण, अपघात, नोंदणी इत्यादी समस्याही निर्माण झाल्या. त्या सर्वांचे नियमन मोटार वाहन विभागातर्फे केले जाते.

राज्यात मोटार वाहनांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून दररोज नवीन वाहनांची भर पडत आहे. वाहन धारकाला तसेच सर्वसामान्य नागरिकाला अधिक सुखसोयी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने वाढत्या संख्येमुळे या विभागाची जबाबदारी वाढली आहे.

प्रत्येक नागरिकांचा काही ना काही कारणपरत्वे मोटार वाहन विभागाशी संबंध येत असतो. त्याच प्रमाणे मोटार वाहन विभागातील अधिकाऱ्यांचा वेळोवेळी नागरिकांशी संपर्क येतो. समाजामध्ये मोटार वाहन कायद्याच्या अंमलबजावणी करिता अधिकारी सतत कार्यरत असतात. नागरिक व मोटार वाहन विभागातील अधिकारी यांच्यामध्ये असलेला हा कायमस्वरुपी संपर्क लक्षात घेता दोघांमध्ये सुसंवाद असणे व नागरिकांना मोटार वाहन कायद्यातील तरतुदींची जाणीव निर्माण करुन देणे अतिशय महत्त्वाचे आहे. “ सेवा श्रध्दा समन्वितः ” या ब्रीद वाक्यानुसार मोटार वाहन विभागाच्या

कामकाजामध्ये पारदर्शकता आणणे व नागरिकांना आवश्यक ती मदत, माहिती व सहकार्य मोटार वाहन विभागाकडून वेळीच उपलब्ध व्हावे. या दृष्टीने मोटार वाहन विभागात संगणकीकरणाचे काम सुरू आहे. या पार्श्वभूमीवर शासन मोटार वाहन विभागाची नागरिकांना मोटार वाहनविषयी कायदे, नियम, कार्यपध्दती याची माहिती करुन देऊन त्यांच्या मनात रस्ता सुरक्षाविषयक कर्तव्याची जाणीव करुन देण्याच्या उद्देशाने नागरिकांची सनद प्रकाशित करित आहे.

या नागरिकांच्या सनदेमध्ये मोटार वाहन विभागाची रचना व मनुष्यबळ, आपली अनुज्ञप्ती कशी मिळवाल, आपल्या वाहनांचे नुतनीकरण, थकीत कराचा भरणा, वाहन वायु प्रदुषण मुक्त ठेवण्याबाबत सुचना, तक्रारी कोठे नोंदवाव्यात ? इत्यादी मुलभूत माहिती दिलेली आहे. तसेच मोटार वाहनाचा अपघात झाल्यावर घ्यावयाची खबरदारी या अतिशय उपयुक्त ठरणाऱ्या माहितीची यात अंतर्भाव करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील जागृत नागरिक या योजनेचा योग्य लाभ घेतील अशी आशा आहे.

अशाप्रकारे सनद करण्याचा हा पहिलाच प्रयत्न असल्याने यामध्ये काही उणीवा राहण्याची शक्यता आहे. तरी सदर बाबतीत नागरिकांच्या काही सूचना असतील तर त्याचे शासनाकडून निश्चित स्वागत होईल.

**(डॉ. सु. वि. जोशी)**

प्रधान सचिव (परिवहन व राज्य उ. शुल्क)